**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी**
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

**माझे नाव** : **रणजित फुलसिंग मारग,**
वय : ४० वर्षे, व्यवसाय : पोलीस उपनिरीक्षक,
नेमणूक : पारनेर पोलीस स्टेशन, ता.जि. अहमदनगर.

**शपथेवर सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.डी.एल. वाडेकर :**

दि.२८/०१/२०२२ ते दि.०९/०९/२०२४ रोजीपर्यंत मी नगर तालुका पोलीस स्टेशनला पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होतो. गु.र.नं.। ५५१/२०२४ चा तपास लेखी आदेशान्वये माझेकडे सोपविण्यात आला होता. मला आता सदर आदेश दाखविला. त्यावर ठाणे अंमलदारांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येते.

२. मला तपासाकामी मुळ फिर्याद, एफ.आय.आर. व दैनिक अहवाल दिला. त्यानंतर मी फिर्यादीचे अवलोकन करुन घटनास्थळी जावुन घटनास्थळाचा पंच साक्षीदारांसमक्ष पंचनामा केला. मला आता नि.क्र.११ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी व पंच साक्षीदारांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे.

३. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब त्यांचे सांगण्यानुसार नोंदविले. तपासादरम्यान वाहनांची तांत्रिक तपासणी कामी आर.टी.ओ. ला पत्र पाठविले होते. आता मला दि.२५/०६/२०२४ रोजीचे माझे सही असलेल्या पत्राची स्थळप्रत दाखविण्यात आली. ती तीच असून त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येते. तसेच सदर तपासणीअंती तयार करण्यात आलेला आर.टी.ओ.चा रिपोर्ट देखील मी हस्तगत केला होता व तो दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला आहे.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.19 15:29:47 +0530

तसेच दोन्ही अपघातग्रस्त वाहनांची कागदपत्रे देखील मी तपासादरम्यान हस्तगत केली. तसेच अपघातग्रस्त वाहनांची तसेच त्या वाहनांना मागुन धडकलेल्या वाहनांचे फोटो देखील मी या प्रकरणात दाखल केलेले आहेत. तसेच तपासादरम्यान मी मोटार वाहन कायदा कलम २०९ अन्वये आरोपी ईश्वर सातपुते यांना नोटीस दिली होती. आता मला सदर दि.२५/०६/२०२४ रोजीच्या नोटीसीची स्थळप्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते.

४. तसेच तपासादरम्यान आरोपीला फौ.प्र.सं. कलम ४१अ अन्वये नोटीस देवुन सोडण्यात आले होते. आता मला सदरची नोटीस दाखविण्यात आली. ती तीच असून त्यास **नि.क्र.२१** देण्यात येते. तसेच तपासादरम्यान अपघातग्रस्त गाडीची कागदपत्रे मी हस्तगत करून दोषारोपपत्रासोबत दाखल केलेली आहेत. तपासदरम्यान आरोपीने गुन्हा केल्याचे दिसून आल्याने त्यांच्याविरोधात न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री.एम.के. शेडाळे :</u>**

५. हे म्हणणे खरे आहे की, नगर–सोलापुर रस्ता हा चौपदरी आहे. हे मला सांगता येणार नाही की, सदर चौपदरी रस्त्याच्या मध्ये असणा–या दुभाजकाला लागुन असणारी लेन ही केवळ अवजड वाहतुक करणा–या वाहनांसाठीच असते.

६. हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान मी तथाकथीत घटनास्थळाच्या लगत असणा–या हॉटेल व्यवसायिकांचे व स्थानिक लोकांचे जबाब

नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी या अपघातात आरोपीची चुकी आहे हे दाखविणा–या प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, हॉटेल साईला असणारे सी.सी.टी.व्ही. चे फुटेज मी तपासादरम्यान जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्यात असणा–या नकाशामध्ये नेमके घटनास्थळ कोठे आहे याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्याच्या रकाना क्र.७ व ८ मध्ये घटनास्थळाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, पंचनाम्यात सदर घटनास्थळाचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

७. दि.२४/०६/२०२४ रोजी या प्रकरणाचा तपास वरिष्ठांच्या लेखी आदेशान्वये मला देण्यात आला होता. सदरचा तपास नेमक्या कोणत्या वेळी माझेकडे देण्यात आला होता हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे योग्य होईल की, गुन्हा दाखल झाल्याच्या अर्धा–एक तासानंतर मला त्या गुन्हयाचा तपास करणेकामी वरिष्ठांचा लेखी आदेश प्राप्त झाला होता.

८. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मी आरोपीला या गुन्हयाच्या अनुशंगाने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४१अ ची नोटीस दिली होती त्यावेळी माझेकडे या प्रकरणाचा तपासच देण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी को–या कागदावर आरोपीची सही घेतली होती व त्यानंतर त्यावर मोटार वाहन कायदा कलम २०९ चा मजकुर टाईप करून घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा पोलीस स्टेशनमध्ये बसुन तयार कण्यात आला होता व तेथेच पंचांच्या सहया घेण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करून आरोपीची कोणतीही चुकी नसताना त्याचेविरूध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा व

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.19 15:29:53 +0530

चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे सरकारी वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.19 15:29:57 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.१९/०१/२०२६**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.